# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/C05008 दिनांक : 21/06/2019

## परिपत्रक

**विषय : २०,००० चौ.मी. पर्यन्त क्षेत्र असलेल्या भूखंडाचा विकास कालावधी सुधारित करणेबाबत.**

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात प्रभाग निहाय्य ३/४/५ वर्षाचा विकास कालावधी देण्यात येतो. सदरहू विकास कालावधी देताना सरसकट सर्व क्षेत्राच्या भूखंडांना प्रभागनिहाय्य सारखाच कालावधी देण्यात आलेला आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये जलद गतीने विकास होणे आवश्यक असल्याने २०,००० चौ.मी. क्षेत्राच्या आतील भूखंडाचा विकास कालावधी कमी करणे आवश्यक वाटत असल्याने याबाबत महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ११.०२.२०१९ रोजी झालेल्या ३७९ व्या बैठकीत विषय चर्चीत होवून ठराव क्र. ५८५० पारीत करण्यात आला. सदरहू पारीत ठरावानुसार २०,००० चौ.मी. पर्यन्त भूखंडांकरीता विकास कालावधी सुधारीत करण्याकरणेबाबत खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे.

१. औद्योगिक क्षेत्रातील ज्या भूखंडाचे क्षेत्र २०,००० चौ.मी. पर्यन्त आहे अशा सर्व औद्योगिक /निवासी/ व्यापारी छोटया/मोठया भूखंड विकासासाठी (भूखंडावरील इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादन सुरु करण्यासाठी) खालीलप्रमाणे विकास कालावधी सुधारीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | प्रभाग | विकासाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | अ व ब प्रभागासाठी | २ वर्षे |
| २ | क प्रभागासाठी | ३ वर्षे |
| ३ | ड व ड+ प्रभागासाठी | ३ वर्षे |

२. औद्योगिक क्षेत्रातील ज्या भूखंडाचे क्षेत्र २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे, अशा सर्व औद्योगिक /निवासी/ व्यापारी छोटया/मोठया भूखंड विकासासाठी (भूखंडावरील इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादन सुरु करण्यासाठी) दिनांक १७.०८.२००४ च्या परिपत्रकानुसार विकास कालावधी लागू राहील.

३. सदरहू धोरण परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून भूखंड वाटप करण्यात येणा-या भूखंडांना लागू राहील.

४. सदर बाब प्राथमिक करारनाम्यात अंर्तभूत करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(अविनाश सुभेदार)
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई